**<u>फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा</u>**

नि.फौ.ख.क्र. ६२/२००५

सरकार –वि– शेख नासीर

नि.क्र.१३

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — राजीक खान लतीफ खान,

वय. ५१ वर्षे, व्यवसाय – सायकल दुकान,

राहणार – बाजार फैल, शेगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

१. मी आरोपी शेख नासीर शेख रफीक याला ओळखत नाही. पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता कोठेही बोलविले नव्हते. मी पोलीसांना फक्त सही दिली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र.२ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता **नि.क्र.१४** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन उलट तपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे</u>. <u>उलट तपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत</u> :–**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१९.०३.२००५ रोजी पोलीसांनी मला बाजार फैल शेगाव येथे फिर्यादी अब्दुल सईद अब्दुल करीम यांच्या घरी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर माझ्यासोबत आजमखान व अब्दुल सईद हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी अब्दुल सईद याने माझ्या समक्ष पोलीसांना त्यांच्या घरुन चार हजार रुपयांची सोन्याची पोथ चोरला गेल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाची चौकशी करुन घटनास्थळ पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा माझ्या समक्ष तयार करुन तो मला वाचून दाखविला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला असल्यामुळे त्याला

शिक्षेपाासून वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०९.०२.२०२६ | दि.०९.०२.२०२६ |